आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१ जानेवारी २०२५ - बुधवार

**ठळक बातम्या**

- डीएपी खतांवर प्रतिटन साडेतीनहजार रुपये विशेष अनुदान पुढं चालू ठेवण्याचा केंद्रीय मंत्रिमंडळाचा निर्णय

- शेतकऱ्यांच्या समृद्धी आणि  कल्याणासाठी केंद्रसरकार वचनबद्ध असल्याचं प्रधानमंत्र्याचं प्रतिपादन

- वस्तू आणि सेवाकर संकलन, गेल्या महिन्यात ७ पूर्णांक ३ दशांश टक्के वाढ

**आणि**

- महाराष्ट्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत ११ जहाल नक्षलवाद्यांचं आत्मसमर्पण

**<><><><><>**

डीएपी, अर्थात डायअमोनियम फॉस्फेट खतांवर प्रतिटन साडेतीनहजार रुपये विशेष अनुदान पुढं चालू ठेवण्याचा निर्णय आज केंद्रीय मंत्रिमंडळानं घेतला. हा निर्णय पुढच्या आदेशांपर्यंत लागू राहील, असं माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंत्रिमंडळ बैठकीनंतर बातमीदारांना सांगितलं. ....

**होल्ड- बाईट - अश्विनी वैष्णव**

प्रधानमंत्री पीक विमा योजना आणि हवामानाधारित पीकविमा योजनेला २०२५-२६ या आर्थिक वर्षापर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय आजच्या बैठकीत झाला. या

योजनांवरची एकूण तरतूद एकोणसत्तर हजार ५१५ कोटी रुपयांनी वाढवली आहे. या योजनेचे सुमारे ८८ टक्के लाभार्थी अल्पभूधारक आणि लहान शेतकरी आहेत. तसंच ५७ टक्के लाभार्थी इतर मागासवर्गीय, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीतले आहेत. गेल्या ८ वर्षात लाभार्थी शेतकऱ्यांचे एक लाख सत्तर हजार कोटी रुपयांचे दावे मंजूर झाल्याचं वैष्णव यांनी सांगितलं. नव्या वर्षातली ही पहिली मंत्रिमंडळ बैठक शेतकऱ्यांना समर्पित असल्याचं वैष्णव यांनी सांगितलं.

प्रधानमंत्री फसल विमा योजनेअंतर्गत नुकसानीच्या पाहणीसाठी रिमोट सेन्सिंग तंत्रज्ञान वापरण्यात येईल,  अशी माहिती केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी बातमीदारांना दिली. याकरता ८२४ कोटी ७७ लाख रुपयांची तरतूद केली असल्याचं त्यांनी सांगितलं. केंद्रसरकारनं तांदळाच्या निर्यातीसाठी किमान भावाची मर्यादा काढून टाकली असल्याचंही त्यांनी सांगितलं. बासमती खेरीज इतर तांदळाच्या व्यापारासंदर्भात आज इंडोनेशियाबरोबर करार झाल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

शेतकऱ्यांच्या समृद्धी आणि कल्याणासाठी केंद्रसरकार वचनबद्ध असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. केंद्रीय मंत्रिमंडळानं आज घेतलेल्या निर्णयांसंदर्भात त्यांनी  सांगितलं, की देशासाठी अन्न पिकवणाऱ्या शेतकऱ्यांचा देशवासियांना अभिमान  आहे.

**<><><><><>**

भारतीय हवाई दलाच्या पश्चिम विभागाचे प्रमुख म्हणून  एअर मार्शल जितेंद्र मिश्रा यांनी आज पदभार स्वीकारला. लढाऊ विमानाचे वैमानिक म्हणून भारतीय

हवाई दलात डिसेंबर १९८६ मध्ये  ते रुजू झाले होते. ३८वर्षांच्या आपल्या सेवा कारकिर्दीत, मिश्रा यांनी  महत्त्वाच्या विविध पदांवर काम केलं आहे. त्यांचे पूर्वसूरी पंकज मोहन सिन्हा यांच्याकडून त्यांनी पदभार स्वीकारला.

**<><><><><>**

आय एन एस शिवाजी या नौदलाच्या तांत्रिक प्रशिक्षण केंद्रात ३५ अधिकाऱ्यांनी नुकताच सागरी अभियांत्रिकी प्राविण्य अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केला. यामध्ये भारतीय नौदलातल्या २१, भारतीय तटरक्षक दलातल्या ४ आणि श्रीलंका, नामिबिया आणि फिलिपाइन्स या देशांमधल्या प्रशिक्षणार्थींनी भाग घेतला होता. नौदलातल्या अधिकाऱ्यांना तांत्रिक कौशल्य आणि सागरी अभियांत्रिकी क्षेत्रातलं अद्ययावत ज्ञान देण्याच्या उद्देशानं हा अभ्यासक्रम आखण्यात आला आहे. याशिवाय अतिशय प्रतिकूल वातावरणात जहाजावर वास्तव्य करणं आणि कोणत्याही कारवाई दरम्यान सर्वोत्तम कामगिरीचं प्रदर्शन करण्यासाठी सज्ज राहण्याचं   प्रशिक्षणही त्यांना दिलं  जातं. या माध्यमातून नौदलाच्या कार्यक्षमतेत वाढ होते शिवाय मैत्रीपूर्ण संबंध असलेल्या राष्ट्रांसोबत प्रशिक्षण सहकार्य देखील वाढीला लागतं.

**<><><><><>**

खराब हवामानाच्या परिस्थितीत हवाई वाहतूक सुरळीत ठेवतानाच उड्डाणाला होणाऱ्या विलंबाचं प्रमाण कमी करणं महत्वाचं आहे असं नागरी हवाई वाहतूक मंत्री किन्जरप्पू राम मोहन नायडू यांना म्हटलं आहे. दाट धुक्यामुळे हवाई उड्डाणांना होणारा विलंब किवा उड्डाणे रद्द होणे या परिस्थितीला तोंड देण्याची पूर्वतयारी करण्याबाबत गेले दोन महिने नागरी हवाई वाहतूक मंत्रालयाकडून

संबधितांशी संवाद साधला जात आहे. खराब हवामानामुळे विमान उड्डाणाच्या वेळांमध्ये होणाऱ्या बदलांबाबत प्रवाशांना वेळीच योग्य कल्पना देणे तसंच अशा वेळी विविध तांत्रिक बाजू सांभाळणाऱ्यांमध्ये समन्वय साधणे या गोष्टींवर या संवादादरम्यान मंत्रालयाचा भर आहे.

**<><><><><>**

श्रोते हो, २०२४ या वर्षभरात सांस्कृतिक क्षेत्रात घडलेल्या घडामोडींचा आढावा आपण ‘२०२४ च्या पाऊलखुणा’ या कार्यक्रमाच्या माध्यमातून घेणार आहोत. उद्या रात्री सव्वा ७ वाजता अस्मिता वाहिनीसह, news on air हा ॲप आणि समाजमाध्यमांवर आपल्याला हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><>**

जीएसटी अर्थात वस्तू आणि सेवाकर संकलन, डिसेंबर महिन्यात गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत ७ पूर्णांक ३ दशांश टक्क्यांची वृद्धी नोंदवून १ लाख  ७६ हजार कोटी रुपयांवर पोहोचलं आहे. डिसेंबर २०२३  मध्ये एकूण जीएसटी संकलन १ लाख ६४ हजार कोटी इतकं होतं.  डिसेंबर २०२४ मध्ये केंद्रीय जीएसटी संकलन ३२ हजार ८३६ कोटी रुपये आणि राज्य जीएसटी संकलन ४० हजार ४९९ कोटी रुपये झालं. एकात्मिक जीएसटी संकलन ४७ हजार ७८३ कोटी रुपये झालं असून उपकर ११ हजार ४७१ कोटी रुपये इतका आहे.

**<><><><><>**

गडचिरोलीत आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत ११ जहाल नक्षलवाद्यांनी शरणागती पत्करली. यात ८ महिला आणि ३ पुरुष आहेत.

त्यांच्यावर राज्यात १ कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेची बक्षिसं असून, छत्तीसगड सरकारनंही त्यांच्यावर बक्षिस जाहीर केलं होतं.

यात दंडकारण्य झोनल कमिटी प्रमुख आणि भूपतीची पत्नी ताराक्का, ३डिव्हिजन किमिटी मेंबर, १ उपकमांडर, तर ३ एरिया कमिटी मेंबर आहेत. या सर्वांना पुढचं जीवन जगण्यासाठी ८६ लाख रुपये आर्थिक मदत देण्यात आली.

उत्तर गडचिरोली माओवादापासून मुक्त झाली, लवकरच दक्षिण गडचिरोली सुद्धा होईल, असं फडनवीस यांनी यावेळी सांगितलं. न्याय मिळायचा असेल तर भारतीय संविधानानंच मिळू शकतो, माओवादी विचारसरणीनं नाही, हे जनतेला आता पटलं आहे, असं ते म्हणाले.

मुख्यमंत्र्यांनी आज गडचिरोली जिल्ह्यात अहेरी ते गर्देवाडा या बससेवेचा प्रारंभ केला, तसंच लॉईडच्या विविध उपक्रमांचा प्रारंभही त्यांनी केला. यातून ६ हजार २०० कोटी रूपयांची गुंतवणूक होत असून, चार हजारावर रोजगारनिर्मिती होत आहे, असं त्यांनी सांगितलं. गट्टा-गर्देवाडा-वांगेतुरी मार्ग तसंच ताडगुडा पुलाचं त्यांनी लोकार्पण केलं. पेनगुंडा इथं फडनवीस यांनी जवानांशी आणि ग्रामस्थांशी संवाद साधला. गडचिरोलीत ग्रीन माईनिंगचा प्रारंभही मुख्यमंत्र्यांनी केला.

**<><><><><>**

भीमा कोरेगाव इथल्या विजय स्तंभ स्मारकाभोवती २०० एकर जागा आणि २०० कोटी रुपयांचा निधी शौर्य स्तंभ स्मारकासाठी द्यावी, अशी मागणी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केली आहे. यासाठी लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याचं ते म्हणाले. विजय स्तंभाला अभिवादन केल्यानंतर ते बोलत होते. मंत्रीमंडळातली रिक्त असलेली जागा, रिपब्लिकन पक्षाला द्यावी, अशी मागणीही त्यांनी केली.

दोनशे सातव्या शौर्य दिनानिमित्त विजयस्तंभाचं दर्शन घेण्यासाठी आज गर्दी झाली होती. विविध राजकीय नेते आणि कार्यकर्त्यांनीही विजयस्तंभ परिसराला भेट दिली.

<><><><>

भारत आणि पाकिस्तानने आपापाल्या अणुप्रकल्पांच्या याद्या एकमेकांना सादर केल्या. उभय देशांमधे अणुप्रकल्पांवर संभाव्य हल्ला रोखण्याच्या दृष्टीनं झालेल्या कराराचा भाग म्हणून दरवर्षी जानेवारीत या याद्या सादर केल्या जातात.

<><><><>

मुंबई शहरातलं वायू प्रदूषणाचं प्रमाण  पूर्ण नियंत्रणात येत नाही तोपर्यंत  ई विभागातल्या बांधकाम प्रकल्पांवरचे  निर्बंध कायम ठेवण्यात येणार  असल्याचं महानगरपालिकेच्या जनसंपर्क विभागानं एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवलं आहे. भायखळा परिसरात सुरु असलेल्या बांधकाम प्रकल्पांची  पाहणी केल्यानंतर महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी हे निर्देश दिल्याचं पत्रकात म्हटलं आहे.

<><><><>

पेट्रोलियम कंपन्यांनी व्यावसायिक वापराचे गॅस सिलिंडर १५ रुपयांनी स्वस्त केलं आहे. मुंबई आता १९ किलो वजनाचं LPG सिलेंडर १ हजार ७५६ रुपयांना मिळेल. घरगुती वापराचे LPG सिलिंडरच्या किंमतीत मात्र काहीही बदल झालेला नाही.

//<><><><>//